३८०३ सा.प्र
१७/०२/१८

20रु. COURT FEE Rs.20 भारत INDIA बीस रुपये TWENTY RUPEES
10 NOV 2017

जोडपत्र अ

(नियम ३ पहा)

**माहितीचा आधिकार अधिनियम, २००५ अन्वये माहिती मिळविण्यासाठीच्या अर्जाचा नमुना**

नगरसचिव विभाग
ज.क्र./न.व./का.व./आ.क्र. २८/१८
दिनांक :- १५/०२/१८

**प्रति,**

**राज्य जन माहिती आधिकारी**

**(कार्यालयाचे नांव व पत्ता)** मिरा भाईंदर महा नगर पालीका नगरसचिव विभाग भाईंदर (प)

१. अर्जदाराचे संपूर्ण नांव : भरत रा. मोकल - 9224233093

२. पत्ता : बि. १/६०४ - पुजा पार्क विनय नगर बोगारी. मिरा भाईंदर रोड मिरारोड (पू) पि.न. 401107

३. हव्या असलेल्या माहितीचा तपशील :

(एक) माहितीचा विषय पेणकर पाड्याती प्र.क्र.४० चे नगर सेवक व सेविका योनी अनाधीकृत बांधकाम केल्या बद्दल आपल्या कडे सुनावनी झाली

(दोन) ज्या कालावधी संबंधात माहिती हवी असेल तो कालावधी २०१६ ते १८

(तीन) हव्या असलेल्या माहितीचे वर्णन महोदय पेणकर पाड्यातील स्थानीक नगरसेविका व नगर सेवक योनी अनाधीकृत बांधकाम केल्या प्रकरणी आपल्या कार्यालयात सुरू दिनांक १२-५-२०१६ रोजी सुनावनी झाली व त्या सुनावनी दरम्यान मि आपनास त्यांनी केलेल्या अनाधीकृत बांधकामांचे पुरावे देखील दिले आहेत. सदर सुनावनीस दिड वर्षे झाले परंतू आपण त्या अनाधीकृत बांधकाम करणाऱ्या नगर सेवकावर कोणतीही कारवाई केलेली दिसून येत नाही.

महोदय नगर विकास खात्याच्या जिआर. क्र. अकोमा. २४०५/अनौ/०५/नवि.२६ नगर विकास विभाग दिनांक २३ एप्रील २००७ च्या प्रमाने नगरसेवक अथावा त्यांच्या नातेवाईकांनी केलेले मुंबई प्रांतिक महानगरपालीका अधिनियमानुसार त्यांना अपात्र ठरवण्याची कारवाई करावी असा जि.आर असून सुध्दा आपण त्यांच्यावर कोणतीही कारवाई का नाही तरी आपण केलेल्या कारवाई चे सर्व कागद पत्रे मला मिळावे.

(चार) माहिती टपालाद्वारे हवी आहे की व्यक्तिशः हवी आहे

(प्रत्यक्ष टपालखर्च अतिरिक्त फी मध्ये समाविष्ट करण्यात येईल)

**(पाच) टपालाद्वारे हवी असल्यास,**

(सर्वसाधारण, नोंदणीकृत किंवा शीघ्र)

**४. अर्जदार दारिद्र्यरेषेखालील आहे किंवा कसे**

(असल्यास, त्याबाबतच्या पुराव्याची छायांकित प्रत जोडावी)

ठिकाण :

दिनांक : 17/02/२०18

भ. रा. मोकल

अर्जदाराची सही / अंगठा

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय,
छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.) ता.जि. ठाणे 401 101
नगरसचिव विभाग

जा.क्र.मनपा/सचिव/मा.अ./२४ /2018 दिनांक :- ०९ /०३ /2018

**प्रति,**
**श्री. भरत रा. मोकल,**
**बी-1/604, पुजा पार्क,**
**विनयनगर जवळ, मिरा भाईंदर रोड,**
**मिरारोड (पूर्व)**

**विषय :- पेणकर पाडयातील प्रभाग क्र. 40 मधील नगरसेवक व नगरसेविका यांनी अनधिकृत बांधकाम केल्याबद्दल झालेल्या सुनावणीबाबत.**

**संदर्भ :- आपणांकडील दि. 17/02/2018 रोजीचा माहिती अधिकार अंतर्गत प्राप्त अर्ज.**

**महोदय,**

उपरोक्त विषयांकित संदर्भित पत्राचे अवलोकन केले असता, आपण पेणकर पाड्यातील तत्कालिन प्रभाग क्र. 40 चे नगरसेवक श्री. परशुराम म्हात्रे व नगरसेविका श्रीम. अनिता पाटील यांचेविरुध्द दाखल केलेल्या तक्रारीवर प्रशासनामार्फत कारवाई होत नसल्याचे नमुद करुन, केलेल्या कारवाई संबंधीत कागदपत्रांची मागणी केली आहे.

त्या अनुषंगाने, प्रभाग क्र. 40 चे नगरसेवक श्री. परशुराम म्हात्रे व नगरसेविका श्रीम. अनिता पाटील यांचेविरुध्द आपण दि. 05/07/2016 रोजी महानगरपालिकेकडे दाखल केलेल्या तक्रारीच्या मुळ नस्तीचे अवलोकन केले असता 1) जा.क्र. मनपा/सचिव/62/2016-17, दि. 11/07/2016 व 2) जा.क्र. मनपा/सचिव/91/2016-17, दि. 17/09/2016 अन्वये प्रभाग अधिकारी, प्रभाग समिती क्र. 06, मिरा भाईंदर महानगरपालिका यांचेकडून उक्त प्रकरणी अहवाल मागणी केल्याचे दिसुन येत आहे. दोन्ही पत्रांची छायांकित प्रत संदर्भास्तव सोबत देत आहोत.

सदर माहितीबाबत आपले समाधान न झाल्यास अपिलीय अधिकारी तथा प्र. नगरसचिव श्री. वासुदेव शिरवळकर, नगरसचिव विभाग, तिसरा मजला, मुख्य कार्यालय, स्व. इंदिरा गांधी भवन, भाईंदर (प.) यांचेकडे 30 दिवसात प्रथम अपिल दाखल करता येईल.

कळावे.

**(कैलास दा. म्हात्रे)**
**जनमाहिती अधिकारी तथा लिपीक**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**
**(भ्रमणध्वनी क्र. 9867077799)**

pc 2\\User001\d\Mahiti Adhikar\Letter - Bharat Mokal.docx

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय,

छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (पश्चिम) ता.जि. ठाणे ४०१ १०१

## नगरसचिव विभाग


जा.क्र मनपा/सचिव/ ९१ /२०१६-१७     दिनांक :- १७/०९/२०१६.

प्रति,
प्रभाग अधिकारी,
प्रभाग समिती क्र. ०६
मिरा भाईंदर महानगरपालिका

विषय :-   नगरसेवक श्री. परशुराम म्हात्रे व नगरसेविका श्रीम. अनिता पाटील ह्यांनी केलेल्या अनधिकृत बांधकामाचा अहवाल देणेबाबत.

संदर्भ :-   दि. १२/०९/२०१६ रोजी अपिल अर्जात सादर केलेली कागदपत्रे.

उपरोक्त विषयानुसार कळविण्यात येत आहे की, नगरसेवक श्री. परशुराम म्हात्रे व नगरसेविका श्रीम. अनिता पाटील ह्यांनी केलेल्या अनधिकृत बांधकामाबाबत त्यांचविरुध्द एम.आर.टी.पी. नुसार गुन्हा दाखल करणेकरिता अपिल केलेले आहे. ज्याची सुनावणी दि. १२/०९/२०१६ रोजी घेतली असून अपिलकर्त्याने संबंधित नगरसेवकांचे बांधकामाची माहिती मागितली असून त्यांचे सोबत दिलेले फोटो सादर केलेले आहेत.

तरी सदर फोटोमधील बांधकामाची चौकशी करुन आपल्या स्तरावर योग्य ती कार्यवाही करुन तसा अहवाल ह्या कार्यालयात देणेत यावा.

(हरि ल. पाटील)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

१९/०९/२०१६

Pranali\Letter\Letter - Prabhag Adhikari 6.docx

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय,
छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (पश्चिम) ता.जि. ठाणे ४०१ १०१

## नगरसचिव विभाग

जा.क्र मनपा/सचिव/ ६२ /२०१६-१७ दिनांक :- ११ /०८/२०१६.

प्रति,
प्रभाग अधिकारी
प्रभाग समिती क्र. ०६
मिरा भाईंदर महानगरपालिका

विषय :- पेणकरपाड्यातील प्रभाग क्र. ४० च्या नगरसेविका व नगरसेवक यांना अनधिकृत बांधकाम केलेबद्दल अपात्र घोषित करुन त्यांच्यावर एम.आय.टी.पी. एक्ट नुसार गुन्हा दाखल करणेबाबत.

संदर्भ :- १) श्री. भरत रामभाऊ मोकल यांचेकडील दि. ०५/०७/२०१६ रोजीचे पत्र.
२) नगररचनाकार यांचेकडील पत्र क्र.मनपा/नर/१६६३/२०१६- १७ दि. ०८/०७/२०१६.

उपरोक्त संदर्भित पत्रान्वये कळविण्यांत येते की, श्री. भरत रामभाऊ मोकल यांनी प्रभाग क्र. ४० च्या नगरसेविका श्रीम. अनिता जयवंत पाटील व नगरसेवक श्री. परशुराम म्हात्रे यांनी सरकारी जागेत अनधिकृत बांधकाम केलेबाबत तक्रार करुन त्यांना अपात्र करणेबाबत मागणी केलेली आहे. तरी वरील दोन्ही प्रकरणी आपला स्वयंस्पष्ट अहवाल या कार्यालयात त्वरीत सादर करावा. जेणेकरुन पुढील कारवाई करणे सोईचे होईल.

कळावे.

(हरेश ल. पाटील)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

मिरा भाईंदर महानगरपालिका
प्रभाग समिती क्र. ०६
११/०८/२०१६
दिनांक